# उद्धव ठाकरे सहभागी होणार अक्षरदीपसंध्याच्या साहित्यदिंडीत

**प्रतिनिधी :** दिवाळी अंकांच्या शतकमहोत्सवाच्या निमित्ताने आयडियल सांस्कृतिक मंच आणि मिती क्रिएशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सात वाजता रवींद्र नाट्य मंदिर येथे 'अक्षरदीपसंध्या' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमापूर्वी मराठीतील 'मनोरंजन' या पहिल्या दिवाळी अंकाची पालखीतून मिरवणूक काढण्यात येणार असून या साहित्य दिंडीत शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे सहभागी होणार आहेत.

मंचाचे मंदार नेरुरकर आणि मिती क्रिएशन्सच्या उत्तरा मोने यांनी आज पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली.

दादर (पश्चिम) येथील आयडियल पुस्तक त्रिवेणीपासून सायंकाळी साडेपाच वाजता या साहित्य दिंडीस सुरुवात होणार आहे. ही दिंडी रवींद्र नाट्य मंदिरापर्यंत काढण्यात येणार आहे.

रवींद्र नाट्य मंदिरात होणाऱ्या कार्यक्रमात गाणी, अभिवाचन, किस्से आदींमधून दिवाळी अंकांचा इतिहास उलगडला जाणार आहे. याच कार्यक्रमात मुंबईतील काही दैनिके आणि दिवाळी अंकांच्या संपादकांच्या उपस्थितीत 'मौज' आणि 'सत्यकथा'चे माजी संपादक आणि ज्येष्ठ पटकथा लेखक ग. रा. कामत यांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर कार्यक्रमाच्या प्रवेशिका आयडियल पुस्तक त्रिवेणी आणि रवींद्र नाट्य मंदिर येथे रसिकांसाठी उपलब्ध आहेत. या कार्यक्रमास रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आणि दिवाळी अंकांच्या या जागरात सहभागी व्हावे, असे आवाहन या वेळी करण्यात आले. ■

## संक्षिप्त

### वनिता विश्वच्या स्पर्धा

मराठा मंदिर संस्थेच्या वनिता विश्व विभागातर्फे १७ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेतीन वाजता महिलांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. हा कार्यक्रम मुंबई सेंट्रल येथील संस्थेच्या जिवाजीराव महाराज शिंदे सभागृहात होणार आहे.

### नाट्यसंस्कार कार्यशाळा

अंतरंग सांस्कृतिक केंद्रातर्फे ठाणे ते कर्जत या विभागातील शालेय विद्यार्थी, कलाकार आणि नाट्यरसिकांसाठी येत्या २१ ऑक्टोबरपासून